# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

## राष्ट्रीय सेवा योजाा

राष्ट्रीय सेवा योजना

NATIONAL SERVICE SCHEME

# ियमित ज ार्यक्र माचा अहवाल व लेजे

## 2017-18

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
# राष्ट्रीय सेवा योजाा
## वार्षिक अहवाल

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग सतत कार्यरत असतो. या विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करुन देण्याचे काम हा विभाग सतत करत आलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी स्वंयसेवकांची संख्या मंजुर करण्यात आली .या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणुन अजय कांबळे व विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून कु. कल्पना फरकांडे हिची निवड करण्यात आली. या विभागाच्यावतीने वर्षभरात विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात.

सन २०१७-१८ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची सुरुवात समन्वय समितीच्या बैठकीत होते. स्थानिक समन्वय समितीची बैठक दि.१०-०८-१७ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठरावावर विचार विनीमय करुन ते ठराव मंजूर करण्यात आले.

१) या वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल आढावा घेण्यात आला.

३) या शैक्षणिक वर्षात कोण-कोणते उपक्रम प्रभावीपणे राबवावे याबद्दल ठराव घेण्यात आला.

**विविध उपक्रम खालील प्रमाणे राबविण्यात आले :**

**१) महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी : (दि.११ एप्रिल, २०१७)**

दि.११ एप्रिल, २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली व उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे यांच्या प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीत महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे यांनी विद्यार्थी, स्वंयसेवक यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. एस.एन. मोरे, प्रा. नितीन चव्हाण, प्रा.डॉ.ए.ए. यादव, प्रा. विकास वाघमारे, आदि उपस्थित होते. प्रारंभी महात्मा फुलेंच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा.श्रीहरी तलवारे यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी प्रतिनिधी बने भिमाशंकर, गिरी शंकर प्रसाद, कांबळे पुजा, अजय कांबळे, कल्पना फरकांडे, गोडसे अश्विनी, शिंदे पल्लवी, विशाल जाधव, आदि विद्यार्थी उपस्थित होते.

**२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व रक्तदान शिबिर (दि.१४ एप्रिल २०१७):**

शुक्रवार दि. १४ एप्रिल २०१७ रोजी रासेयो विभागतर्फे राजर्षी शाहू महाविद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२६ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच या जयंती निमित्त महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ. भालचंद्र ब्लड बँक लातूर च्या वतीने या महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान कार्यक्रमात प्राध्यापक युवराज शिखरे डॉ. अनिरूद्ध बिराजदार लिपीक श्री. दत्ता कांबळे, श्री. अमोल सज्जन शेटी, श्री. महेश शिंदे, या प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचायांसह ३१ विद्यार्थ्यांनी रक्तदान क रून बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, पर्यवेक्षक कल्याण कांबळे रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. पी. जी. कावळे, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. व्ही. ए. गवळी तसेच भालचंद्र ब्लड बँकेचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. एस.पी. मोरे, जनसंपर्क अधिकारी श्री. दिगंबर पवार, श्री. किशोर पवार, तंत्रज्ञ श्री. सुनिल जहागीरदार, श्री. फरहान शेख, सहाय्यक तंत्रज्ञ श्री. संजय अंकुर, श्री. अन्सार शेख इ. उपस्थित होते.

सदर रक्तदान कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंमसेवक विद्यार्थी प्रतिनिधी रविकुमार घुले, महेश बिडवे, अमोल गेजगे, सुनिल जाधव, सचिन लांगोटे, गडेराव कुंभार, कमलाकर सांडुर खरोसे दिपाली, लोखंडे प्रगती, चौहाण कल्पना, ढगे अमोल, यांनी स्वतः रक्तदान करून विशेष सहकार्य केले.

**३. राजर्षी शाहू महाराज जयंती : (दि.२६ जून, २०१७)**

दि.२६ जून, २०१७ रोजी छत्रपती शाहू महाराज यांची १४३ वी जयंती निमित्त महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याप्रसंगी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पमाळा अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तर याप्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.श्री. गोपाळरावजी पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, सचिव ॲड. नारायणराव पाटील, सहसचिव डॉ.दि.बा.गोरे, सहसचिव अनिरूद्ध जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्यक्रमाधिकारी उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.एस.एम.तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, रा.से.यो. विद्यार्थी प्रतिनिधी रविकुमार घुले, अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मलवाडे प्रिती, शिंदे पल्लवी, रेड्डी वैष्णवी, सगट अविनाश, मिरजकर प्रशांत, सुशील सुरवसे आर्दीनी परिश्रम घेतले.

**४) सामाजिक समता न्याय दिन संपन्न : (दि.२६ जून, २०१७)**

शिव छत्रपती शिक्षण संस्था, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि.२६ जून, २०१७ रोजीच राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक समता न्याय दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून शि.छ.शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील लाभले होते. प्रारंभी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पाहुण्यांच्या हस्ते पुष्पाहार व पुष्पाजंलि अर्पण करण्यात आली. तर शाहू महाराजांच्या १४३ व्या जयंती प्रसंगी त्यांच्या कार्याविषयी मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील यांनी गौरवोद्‍गार काढले. याप्रसंगी संस्थेचे सदस्य प्रा.एम.एस.देशमुख, प्राचार्य व सदस्य डॉ.आर.एल.कावळे,

श्री शिवाजी भोसले,श्री उद्धव पाटील, श्री आनंद माने, डॉ.शेखर गरड, श्री गोपाळ शिंदे, श्री महादेव मुळे, श्री धर्मराज हल्लाळे, श्री प्रकाश देशमुख इत्यादी संस्था सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे, उपप्राचार्या श्रीमती एम.एम. दुरुगकर, विशेष कार्यासन अधिकारी डॉ.ई.यु. मासुमदार, परीक्षा नियंत्रक डॉ.ओ.व्ही. शहापूरकर, प्लेसमेंट अधिकारी प्रा.राहुल आठवले, सांस्कृतिक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.दिपक वेदपाठक, रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी.सावंत, प्रा.डॉ.पी.जी.कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.विजय गवळी तसेच प्रा. विलास कांबळे, प्रा. एच. जी. जोशी, एस. एन. शिंदे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा.डॉ. अर्चना टाक, प्रा. सायली समुद्रे इत्यादी मान्यवर आवर्जुन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे प्रा.डॉ.दिपक वेदपाठक, प्रा.श्रीहरी एम. तलवारे व प्रा.विजय ए. गवळी यांनी केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. के. डी. सावंत यांनी तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी केले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी व स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**५) आव्हान शिबिर : (दि.०१ ते १० जुन २०१७)**

दि.०१ ते १० जुन २०१७ पार पडलेल्य आव्हान शिबिरात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे महाविद्यालयात चार स्वयंसेवकांनी सभगा नोंदवला. यामध्ये अजय कांबळे, श्री. शिवकांत डोणगावे,

कु. रविना मोरे, व कु. अनिता फड या विद्यार्थ्यांनी शिबिरा दरम्यान सर्वच स्पर्धामध्ये उत्कृष्ठ असा सहभाग नोंदवला याबद्दल त्यांचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले.

**६) मतदार नोंदणी उपक्रम : (दि.१० जुन ते १५ जुलै २०१७)**

तहसील कर्यालय लातूर व महाराष्ट्र शासन व राजर्ष्री शाहू महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० जुन ते १५ जुलै २०१७ दरम्यान महाविद्यालयामध्ये नविन मतदार कार्यक्रम राबविण्यात आला या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातून कार्यक्रम अधिकारी डॉ.के.डी.सावंत यांची नोडल ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली या कार्यक्रमाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी नविन मतदार नोंदणीसाठी परिश्रम घेऊन या मोहित उत्स्फुर्त सहभाग नोंदवली.

**७) स्वंय सेवकांची नांव नोंदणी : (१ जूलै ते ०८ ऑगस्ट, २०१७)**

दि.१ जुलै ते ०८ ऑगस्ट, २०१७ दरम्यान शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता रा.से.यो. विभागातर्फे स्वंयसेवक नोंदणी कार्यक्रम महाविद्यालयात राबविण्यात आला. यामध्ये साधारणता १५० ते १६४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १०० विद्यार्थ्यांची निवड दि.१२ ऑगस्ट २०१७ पर्यंत गुणवत्तेनुसार व मार्गदर्शक तत्वांनुसार करण्यात आली. सदरील नोंदणी व निवड कार्यक्रमास कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी.सावंत तसेच अजय कांबळे, सुशिल सुरवसे यांनी सहकार्य केले.

**८) लातूर वृक्ष लागवड उपक्रमाचे आयोजन : (दि.०१ ते १५ जुलै २०१७)**

दि.०१ ते १५ जुलै २०१७ रोजी लातूर वृक्ष समिती व राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वृक्ष लागवडीची मोहीम सदर वर्षात सुरू करण्यात आली. या मोहिमेचा भाग म्हणून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयातील रासेयो समन्वय समितीने १००१ वृक्ष लागवडीचा संकल्प केला व लातूर मधील विविध परिसरात २५० ते ३०० वृक्षांची

लागवड केली.

या प्रसंगी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या २०० ते २५० स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवलेला होता. या प्रसंगी लातूर वृक्ष समितीचे दक्ष नागरिक समन्वय श्री. सुपर्ण जगताप, नगरसेवक श्री. इमराण सय्यद, श्री. महेश बिडवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी इतर प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा. सुदर्शन पाटील व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मलवाडे प्रिती इत्यादींनी परिश्रम घेतले.

**९) राष्ट्रीय साक्षरता दिन (दि. ०८ जुलै २०१७)**

दि.०८ जुलै, २०१७ रोजी रा.से.यो. विभागाच्या वतीने राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय साक्षरता दिन साजरा करण्यात आला. यावेळी रासेयोचे विद्यार्थी व कार्यक्रमाधिकारी यांनी संकल्प केला की, समाजातील शिक्षणापासून वंचीत असलेल्या बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आनन्यासाठी सर्वजण विशेष प्रयत्न करतील. तसेच या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.एम.एच. गव्हाणे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. तर कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी यांनी हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सहकार्य केले. तर विद्यार्थी प्रतिनिधी रवी घुले, अजय कांबळे, कल्पना फरकांडे, दक्षनागरीक महेश बिडवे आदी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**१०) गुरुपौर्णिमा निमित्त शिक्षकांचा सन्मान : (दि.१० जुलै, २०१७)**

दि. ०९ जुलै, २०१७ रोजी रविवारी सुट्टी असल्यामुळे सोमवार दि. १० जुलै २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्यावतीने गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून 'गुरूपौर्णिमा कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना गुलाब पुष्प भेट देऊन गुरूंची गौरव महिमा गायली. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, अमोल गेजगे, दक्ष नागरिक महेश बिडवे आदि स्वंयसेवक उपस्थित होते. याप्रसंगी प्रा.विजय दळवी, प्रा.माधव शेळके, प्रा.सुधीर जाधव, प्रा.डॉ.संभाजी पाटील, प्रा. संगिता तोडकर, प्रा. सुचिता वाघमारे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. सुधिर जाधव इत्यादी प्राध्यापकांचा सन्मान करण्यात आला.

**११) सल्लागार समितीची बैठक : (दि.१० ऑगस्ट, २०१७)**

दि.१० ऑगस्ट, २०१७ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके सर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्यांच्या दालनात सल्लागार समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत बैठक बोलाविण्यात आली होती.

सदरील बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वर्षभर राबविण्यात येणाया विविध उपक्रम व कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भात साधकबाधक चर्चा करुन वर्षभरातील विविध उपक्रम व कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस सल्लागार समितीचे सदस्य उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, डॉ.ए.जे.राजू, प्रा.डॉ.ई.यू. मासुमदार, प्रा.डॉ.अनुजा जाधव, प्रा.डॉ.प्रिती पोहेकर

इत्यादी सदस्यांनी मोलाच्या सूचना केल्या.

सदरील बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी एम.तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, रा.से.यो. विभागाचे सल्लागार समितीचे सर्व सदस्य तसेच विद्यार्थी प्रतिनिधी रवी घुले, कल्पना फरकांडे, अजय कांबळे आदि उपस्थित होते.

**१२) राज्यस्तरिय सर्वोत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कारासाठी निवड : (दि. २५ जुलै २०१७)**

राजर्षी शाहू महाद्यिालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थीनी स्वयंसेवीका कु. माधुरी जगताप हिने महाविद्यालयात व स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड येथे रासेयो अंतर्गत सन २०१६-१७ मध्ये निस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करत उत्कृष्ठ कामगिरी केली. म्हणुन महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरिय उत्कृष्ठ स्वयंसेविका पुरस्कारासाठी तिची निवड केली. या निवडीबद्दल शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. श्री. गोपाळरावजी पाटील, सचिव अॅड. श्री. नारायणराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, प्रभारी सहसचिव अनिरुद्ध जाधव, सदस्य डॉ.दि.बा.गोरे, प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. पी. जी. कावळे प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. व्ही. ए. गवळी व महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनी तिचे कौतुक केले.

**१३) लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आण्णाभाऊ साठे जयंती : (दि.०१ ऑगस्ट, २०१७)**

दि.०१ ऑगस्ट,२०१७ रोजी रा.से.यो. विभागाच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यीक आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावरती विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, डॉ. ओ. व्ही. शहापूरकर, पर्यवेक्षक व्ही.के. कांबळे, प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा. नितीन चव्हान, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे इ. स्वंयसेवक उपस्थित होते.

**१४) आपत्कालिन मदत : (दि.०१ ऑगस्ट, २०१७)**

दि. ०१ ऑगस्ट २०१७ रोजीच लोकमान्य टिळक जयंती साजरा केल्यानंतर गँगरीन आजाराने ग्रस्त रोगी श्री. शिवाजी पांडूरंग चव्हाण, या अपंग व्यक्तिच्या शस्त्रक्रियेसाठी महाविद्यालयातील रासेयो विभागातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी व कार्यक्रमाधिकायांनी महाविद्यालयातील शिक्षक , प्राध्यापक, विद्यार्थी यांच्याकडून मदत निधी जमा करुन त्यांना उपचारासाठी एकूण रू.१५०००/- (पंधरा हजार रू.) ची मदत करण्यात आली. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी लोकमान्य टिळक व आण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावरती विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.ए.जे.राजू, डॉ. ओ. व्ही. शहापूरकर, पर्यवेक्षक व्ही.के. कांबळे, प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा. नितीन चव्हान, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे इ. स्वंयसेवक उपस्थित होते.

**१५) क्रांती दिन : (दि.०९ ऑगस्ट, २०१७)**

दि.०९ ऑगस्ट,२०१७ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके सर यांच्या अध्यक्षतेखाली क्रांती दिनाच्यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला रासेयो चे कार्यक्रमाधिकारी इतर प्राध्यापक वृंद व बहुसंख्य विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

**१६) बोल बिंधास्त नाटीकेचे सादरीकरण : (दि.१४ ऑगस्ट २०१७)**

१४ ऑगस्ट २०१७ रोजी शहरातील दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात नारी प्रबोधन मंच आणि नक्ष नागरिकाच्या वतीने सायंकाळी ०४ वाजता **बोल बिंधास्त** नाटिकेचे सादरिकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. व्ही.ए.गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, चव्हाण विष्णू, सुरवसे स्वाती, कदम स्वप्ना आदीसह रासेयोच्या एकूण १८ विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवला या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. इंदिरा लोहोटी, प्रमुख पाहुण्या प्रसिद्ध लेक्षिका व सामाजिक कार्यकतर्या सौ. रजिया सुलताना, प्राचार्या कुसुमताई यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले तर दिग्दर्शक शुभांगी दामले व प्रमोद काळे यांच्या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले.

**१७) अ) स्वातंत्र्य दिनः (दि.१५ ऑगस्ट, २०१७)**

दि.१५ ऑगस्ट, २०१७ रोजी महाविद्यालयाच्या प्राणंगणात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व सर्व सदस्य मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. सदरील कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, छात्र सेना (मुले,मुली) व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी व स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आ) तिरंगा रॅलीत सहभाग : दि.१५ ऑगस्ट, २०१७** या दिवशी महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी प्रा. व्ही.ए.गवळी यांनी विद्यार्थी परिषद लातूर द्वारा आयोजित तिरंगा रॅलीत सहभाग नोंदवला. या रॅलीचे नेतृत्व रासेयोचे जिल्हा समन्वयक डॉ. संदिप जगदाळे यांनी केले. भारतीय एकात्मतेचा संदेश देणारी ही रॅली दयानंद महाविद्यालय ते टाऊन हॉल पर्यंत काढण्यात आली.

**१८) एड्स जनजागृती रॅली : (१९ ऑगस्ट २०१७)**

दि.१२ ऑगस्ट या आंतराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून दि. १९ ऑगस्ट २०१७ रोजी जिल्हा आरोग्य केंद्र लातूर व राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या संयुक्त विद्यमाने समाजात एड्स संदर्भात जाणिव जागृती करण्यासाठी पोस्टर दाखवून, घोषणांच्या आवाजात राजर्षी शाहू महाविद्यालयापासून लातूर मुख्य बस स्थानक, गंजगोलाई, सोनार गल्ली ते गुळ मार्केट मार्गे परत शाहू महाविद्यालयापर्यंत १५०० विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. व रांगेत उभे राहुन एच.आय.व्ही. एड्स चे बोध चिन्ह (रेड रिबन) साकारुन समाजाला जागृत राहण्याचा संदेश दिला.

या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके यांनी केले. या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, उपप्राचार्य ए.जे.राजू, पर्यवेक्षक, प्रा. विलास कांबळे, जिल्हा आरोग्य केंद्राच्या (आय.सी.टी.सी) च्या समुपदेशक सौ. सिंधू सोमवंशी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, सौ. सुनिता मिटकरी,

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. पी. जी. कावळे, प्रा. व्ही. ए. गवळी, प्रा. श्रीहरी तलवारे तसेच प्रा. ओमप्रकाश मदनसुरे इ. उपस्थित होते. तर पोलीस दल लातूर चे पोलीस कर्मचारी व रासयोचे विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, महेश बिडवे, मोरे प्रतिक्षा, चौहाण विष्णू, बनसोडे कृष्णा, शेख सोनी, कस्तूरी गवळी, विशाल गाडे, मटपती आरती यांनी रॅली यशस्वी होण्यासाठी विशेष सहकार्य केले.

**१९) आरोग्य तपासणी शिबिर व विविध स्पर्धेचे आयोजन : (दि.२३ ऑगस्ट, २०१७)**

आंतराष्ट्रिय युवा सप्ताह व शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ता दि. २४ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०४.३० या वेळेत राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हा आरोग्य केंद्र लातूरच्या संयुक्त विद्यमाने एड्स या विषयावर **पोस्टर प्रदर्शन, रांगोळी स्पर्धा व मोफत एच.आय.व्ही. एड्स रोगाची तपासणी तसेच मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे** आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थी व नागरिकांनी मोठया संख्येने शिबिरात भाग घेऊन आपल्या आरोग्याची व रक्ताची तपासणी करुन घ्यावी असे आवाहन दि.२३ ऑगस्ट रोजी करण्यात आले. व या निमित्त दि. २४ ऑगस्ट रोजी सदर उपक्रम घेण्यात आले. या वेळी पोस्टर प्रदर्शनाचे प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम. एच. गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत कु. धनगावे गौतमी, हिची प्रथम तर जाधव बालाजी व शेख रूखय्या यांची अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाने निवड झाली.

या स्पर्धेचे परिक्षण डॉ. पल्लवी पाटील, प्रा. आर के. आर्य यांनी केले. रांगोळी स्पर्धेत विशाल जाधव यांची प्रथम तर कु. प्रणिता मानतोलिया कु. अनुजा ननुरे, कु. पवार शितल यांची अनुक्रमे द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ निवड झाली. या युवा सप्ताह निमित्त महाविद्यालयात १४९ विद्यार्थी व प्राध्यापकांची एच.आय.व्ही. एड्स ची तपासणी करण्यात आली. या तपासणीचे परिक्षण आय.सी.टी.सी. चे समुपदेशक व प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. जाधव एस. डी. यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम.एच.गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा. विलास कांबळे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. पी. जी. कावळे, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी इ. उपस्थित होते. सदर उपकृम यशस्वी करण्यासाठी रासयो चे विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, चौहाण विष्णू, महेश बिडवे व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

**२०) युवा सप्ताह व संस्था सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त रक्तदान शिबिर :(दि.२४.०८.२०१७)**

दि. २४ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयात युवा सप्ताह व शिव छत्रपती शिक्षण संस्था सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील प्रा.श्रीनिवास मोर, प्रा. युवराज शिखरे, प्रा. योगेश राठोड, लिपीक श्री. महेश शिंदे यांच्यासह एकुण ७२ जणांनी रक्तदान केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य एम.एच.गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा. विलास कांबळे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. पी. जी. कावळे, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी, प्रा. अनिरूद्ध बिराजदार, डॉ. भालचंद्र ब्लड बँकेचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. एस. पी. मोरे, जनसंपर्क अधिकारी श्री. दिगंबर पवार, श्री. किशोर पवार, श्री. सुनिल जहागीरदार, श्री. फरहान शेख त्यांचे सहकारी तसेच उपस्थित होते. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी रासयो चे विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, चौहाण विष्णू, महेश बिडवे, मोरे प्रतिक्षा, प्रगती लोखंडे, सोनाली

बोयणे व इतर विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**२१) दिशा निर्देशनपर कार्यक्रमाचे आयोजन : (दि.२८ ऑगस्ट, २०१७)**

दि.२८ ऑगस्ट, २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये रा.से.यो. विभागात निवड झालेल्या स्वंयसेवकांसाठी दिशा निर्देशनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील २६० स्वंयसेवकांनी आपला सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी भूषविले. या कार्यक्रमात रासयो चे विभागीय समन्वयक व उपप्राचार्य डॉ. एच.एच. गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय व या कोणकोणते उपक्रम चालतात, कोणत्या संधी आहेत. याबद्दल बहुमोल मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, प्रा. विजय दळवी, प्रा.राजेंद्रप्रसाद शास्त्री, प्रा.सुदर्शन पाटील, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. श्रीनिवास मोरे व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, दक्षनागरिक महेश बिडवे आदि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**२२) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती : (दि.०५ सप्टेंबर, २०१७)**

दि.०५ सप्टेंबर, २०१७ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून रासेयो विभागात माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्प व पुष्पहार अर्पण करुन त्यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी रासेयो च्या विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन शिक्षकांचा सन्मान पुर्वक सत्कार केला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.डी. साळुंके यांनी खरा शिक्षक कसा असतो याबद्दल विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एम.एच.गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा. विलास कांबळे, रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, प्रा. विजय दळवी, प्रा.राहुल आठवले, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. संगीता तोडकर, ग्रंथपाल एस. बी. मस्के, प्रा.सुदर्शन पाटील, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. श्रीनिवास मोरे व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, दक्षनागरिक महेश बिडवे इ . उपस्थित होते.

**२३) विशेष योगदान दिल्याबद्दल संस्थेकडून सत्कार : (दि.०५ सप्टेंबर, २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या सुवर्ण वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ०५ सप्टेंबर राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून शिक्षक दिनाचा कार्यक्रम शिव छत्रपती शिक्षण संस्थेने दि.१० सप्टेंबर, २०१७ रोजी 'शाहू भूषण' गौरव सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाया, महाविद्यालयातील विविध उपक्र मात सहभाग नोंदवणाया दिलेले उद्दिष्ट साध्य करणाया आणि संस्थेने ठरवून दिलेल्या नियमां चे आणि उद्दिष्टांचे पालन करणाया कर्मचायाची दरवर्षी ०५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्यावतीने 'शाहू भूषण' व पुरस्कार विशेष गौरव केला जातो.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, डॉ. पी. जी. कावळे, प्रा. विजय गवळी, प्रा. श्रीहरी तलवारे, यांनी रासेयो विभागात विशेष योगदान दिल्याबद्दल गुण गौरव सोहळयाच्या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.श्री. गोपाळरावजी पाटील, डॉ.पी.आर.देशमुख, प्राचार्य अनिरुद्ध जाधव, प्राचार्य डॉ.आर.एल. कावळे, यांच्या हस्ते सत्कार मूर्तींचा स्मृति चिन्ह देवून हृद्यसत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्था सदस्य प्रा.एम.एस.देशमुख, श्री गोपाळ

शिंदे, श्री शिवाजी भोसले, डॉ.शेखर गरड, डॉ.सुहास गोरे, श्री मकरंद देशमुख, श्री आनंद माने, श्री धर्मराज हल्लाळे, श्री उद्धव पाटील, प्रा.प्रकाश देशमुख आदि मान्यवर व प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

**२४) मराठवाडा व हैद्राबाद मुक्ति संग्राम दिन तसेच व्यक्तिमत्व कार्यशाळा :** (दि.१६ ते ७ सप्टेंबर, २०१७)

दि.१६ आणि १७ सप्टेंबर, २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय व फाईट प्रसाद शेंडगे मेमोरियल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यामाने व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत पहिल्या दिवशी प्रयोगशील शेतकरी प्रा. नगनाथ कनाने, दुग्ध व्यावसायीक श्री, सतीश देशमुख, बीज उत्पादक, श्रभ्. बाळासाहेब दाताळ, यांनी प्रकट मुलाखतीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. शेषेराव मोहिते, डॉ. भरत देशमुख यांनी त्यांची मुलाखत घेतली या कार्यक्रमात प्रभारी सचिव अनिरुद्ध जाधव, पत्रकार धर्मराज हल्लाळे, प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.विजय गवळी, व रासेयो चे व्सयंसेवक विद्यार्थी मोठया प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्राचे प्रास्ताविक संस्थेचे प्रभारी सचिव अनिरूद्ध जाधव यांनी तर सुत्रसंचलन डॉ. प्रिती पोहेकर यांनी केले.

दि. १७ सप्टेंबर, २०१७ रोजी महाविद्यालयात सकाळी ०७.३० वा. मराठवाडा व हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहन कार्यक्रम घेण्यात आला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच अध्यक्ष डॉ. गोपळारव पाटील, संस्थेचे सर्व सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, रसेयोचे कार्यक्रमाधिकारी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. याच दिवशी सकाळी १०.०० वा. व्यक्तिमत्व विकास कार्यशाळात प्रसिद्ध उद्योजगता या विषयावर मार्गदर्शन केले. सॅनेटरी नॅपकीनचा प्रकल्प उभारणाया छाया काकडे, तिरूपती पेन्ट्रसचे श्री . वामनराव धुमाळ, व द्वारकादास शामकुमार चे तुकाराम पाटील यांनी आपल्या उद्योग उभारणीतील अनुभव कथन करत रासेयो च्या व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना उद्योगाकडे वळण्याचा कानमंत्र दिला. या उद्योजाकंची मुलाखत जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, धर्मराज हल्लाळ, यांनी घेतली. यावेळी प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच.गव्हाणे, उपप्राचार्य ए. जे. राजू, संस्थासुवर्ण महोत्सव समितीचे संयोजक डॉ. भरत देशमुख रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, महाविद्यालयातील शिक्षक व शिखकेत्तर कर्मचारी मोठया प्रमाणावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अनुजा जाधव व प्रा. सूर्यकांत चव्हाण यांनी केले.

**२५) अपंग मुलांची आरोग्य विषयक कार्यशाळा : (दि.२२ व २३ सप्टेंबर २०१७)**

दि.२२ व २३ सप्टेंबर २०१७ रोजी मा. आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर आणि संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील अपंग मुलांचे आरोग्य विषयक जनजागृती तसेच त्यांचे त्वरीत निदान व हस्तक्षेप (Early Detection & Intervention) बाबत जाग्रती करणे करिता रूक्मिणी मंगल कार्यालय, औसा-बार्शी रोड, पोतदार इंटरनॅशनल स्कुलच्या समोर लातूर येथे दोन दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदरच्या कार्यशाळेत दि.२३ सप्टेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील रासेयो विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय ए. गवळी,

विद्यार्थी प्रतिनिध अजय कांबळे, गोटके पवन, मस्के सागर, बने भिमा शंकर, सुरवसे स्वाती, गाडेकर आंबिका, घोबाळे नेहा, सुर्यवंशी केदारनाथ, रवी काळे, सगट अविनाश, चौहान विष्णू,खराडे मोहन, जाधव विशाल, गिरी अभिषेक इ. उपस्थित होते.

**२६) शैक्षणिक वनसहल : (दि. २४ सप्टेंबर २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील, राष्ट्रीय सेवा योजना विभागाची दि.२४ सप्टेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर ते रामलिंग येडशी या ठिकाणी शैक्षणिक वनसहल काढण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजच्या विद्यार्थ्यांनी उस्मानाबाद जिल्हा तेर येथील संत गोरोब काका व श्री. स्वंभू निलकंठेश्वर महादेव मंदिर पाहिले तसेच कै. रामलिंगाप्पा लामतूरे शासकीय वास्तू संग्रहालय तेर, जि. उस्मानाबाद येथे शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने सदिच्छा भेट दिली. व रामलिंग येथील वनसहलीचा आनंद घेतला. या वनसहलीत कनिष्ठ महाविद्यालयातील ७५ मुली व ३२ मुले असे एकुण १०७ विद्यार्थी व वरिष्ठ महाविद्यालयाचे मुले मुली मिळुन एकुण ७२ विद्यार्थी असे एकुण १७९ विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग घेत या शैक्षणि वनसहलीची अनुभूती घेतली.

**२७) राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा : (दि.२६ सप्टेंबर, २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील, लातूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२४ सप्टेंबर, राष्ट्रीय सेवा योजना दिना निमित्त दिनांक २६ सप्टेंबर रोजी मराठवाडा व हैद्राबाद मुक्ति संग्राम दिन या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम करून घेण्यात आला या कार्यक्रमात तुळजापूरच्या कॉलेजमध्ये इतिहास विभागप्रमुख डॉ. सतिष कदम यांनी वरील विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच या कार्यक्रमात महाराष्ट्राचे प्रसिद्ध कवी आणि विचारवंत प्रा. ज्ञानेश्वर वाकूडकर यांनी बळीराच्या मुला याविषयावर आपल्या कवीता सादर करत विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके संस्थेचे सदस्य, प्रा. एम.एस. देशमुख, उपप्राचार्य एम.एच. गव्हाणे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पी.जी. कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे मोरे प्रतिक्षा विष्णू चव्हाण इ. व रा.से.यो चे विद्यार्थी स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

**२८) राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व लालबहाद्दुर शास्त्री यांची जयंती (स्वच्छ भारत अभियान): (दि.०२ ऑक्टोबर, २०१७)**

दि.०२ ऑक्टोबर, २०१७ रोजी रा.से.यो. विभागाच्यावतीने महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व थोर समाज सुधारक लालबहाद्दुर शास्त्री यांचीजयंती साजरी करण्यात आली. याबरोबरच महाविद्यालयात प्राचार्यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राणंगणात विद्यार्थी व स्वंयसेवक यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी स्वच्छतेची शपथ दिली. यानंतर स्वंयसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर व वर्ग खोल्यांची स्वच्छता केली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या कनिष्ठ विभागाचे ३० ते ४० विद्यार्थी व वरीष्ठ विभागाचे १५० ते २०० स्वंयसेवकांनी भाग घेतला.

हे स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी यांनी अथक परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमास प्रा. योगेश राठोड, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा.सुदर्शन पाटील, प्रा.

सुधीर जाधव, प्रा.युवराज शिखरे, प्रा.माधव शेळके, प्रा.सांमदेव शिंदे, प्रा.विकास वाघमारे आदिनी सहभाग नोंदवून स्वच्छ भारत अभियान प्रभावीपणे राबविले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रतिनिधी अनुक्रमे अजय कांबळे, कल्पना फरकांडे, योगेश सुर्यवंशी, कु. मोरे प्रतिक्षा, चौहान विष्णू, खापे दुर्गा, पुजा सोनवणे, डोणगावे शिवकांत तसेच कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग नोंदवला.

**२९) अंध मुलांच्या स्वकौशल्याला प्रेरणा व प्रोत्साहन : (दि. १८ ऑक्टोबर २०१७)**

स्वाधार केंद्र बुधोडा जिल्हा लातूर येथील अंध मुलांनी स्व-कौशल्याचा वापर करत रसायन मुक्त उटणे निर्माण केले. या अंध मुलांन प्रोत्साहन व प्रेरणा देण्यासाठी दि. १८ ऑक्टोबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी अंध मुलांच्या स्वकौशल्यातून निर्मीत उटण्याची विक्री करुन त्यांना मदत केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी एम.तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, विष्णू चव्हाण, अजय कांबळे, उपस्थित होते.

**३०) मतदार जनजागृती अभियान : (दि.०५ ऑक्टोबर, २०१७)**

रा.से.यो. विभागाच्यावतीने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मतदान जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. ०५ ऑक्टोबर, २०१७ रोजी मतदान जनजागृती संदर्भात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या सदरील कार्यक्रमास रो.से.यो.च्या स्वंयसेवकाबरोबरच महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके यांनी भूषविले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य व विभागीय समन्वयक डॉ.एम.एच. गव्हाणे, डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.विजय गवळी आदि कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते. मतदान जनजागृती अभियान यशस्वी पार पाडण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, दक्षनागरीक महेश बिडवे यांनी परिश्रम घेतले.

**३१) राष्ट्रीय एकता दिनानिमित्त सरदार वल्लभाई पटेल व इंदिरा गांधी यांना अभिवादन : (दि.३१ ऑक्टोबर, २०१७)**

दि.३१ ऑक्टोबर हा दिवस भारत सरकारने लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म दिवस 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरा करण्याचे घोषित केलेले आहे. त्या अंतर्गत महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्या वतीने राष्ट्रीय एकता दिवस संपन्न करण्याचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये रा.से.यो. चे स्वंयसेवकांना या कार्यक्रमप्रसंगी प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. तर विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, पर्यवेक्षक प्रा. विलास कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी.सावंत, प्रा.डॉ.पी.जी.कावळे, प्रा.श्रीहरी एम.तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, प्रा. आर.एम. आठवले, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. आर. एन. पंडित, प्रा. युवराज शिखरे, प्रा. नितीन चव्हाण, प्रा. योगेश राठोड, तसेच रासयो विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, व भारत स्काऊट गाइड चे विद्यार्थी मोठया संख्येने

उपस्थित होते.

**३२) चित्र रथाद्वारे वृक्षारोपन जनजागृती कार्यक्रम : (दि.०७ ते ०९ नोव्हेंबर २०१७)**

**महाराष्ट्र ग्रीन आर्मी मध्ये विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत सहभाग :**

राजर्षी शाहू महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या वतीने चित्र रथाच्या माध्यमातून वृक्षारोपन संदर्भात जनजाग्रती करण्यात आली. या वेळी महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी यांच्या सह २५० रासेयोच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र ग्रीन आर्मी मध्ये स्वयंसेवक बनण्यासाठी ऑन लाईन नांदणी करुन सहभाग नोंदवीला व नोंदणी प्रमाणपत्र देखील वितरीत करण्यात आलेत. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, डॉ. ई.यु. मासुमदार, डॉ. व्ही. ए. शेंबेकर, पर्यवेक्षक विलास कांबळे, प्रा. आर. एम. आठवले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी एम.तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, वनविभाग, लातूर चे वनपाल श्री. पचकांडे श्री. चिले, वनरक्षक व रासेयो चे विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, विष्णू चव्हाण, अजय कांबळे, यांच्यासह मोठया संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**३३) विभागीय निबंध स्पर्धा (दि.१३ नोव्हेंबर २०१७)**

समाजात सामाजिक सलोखा कायम रहावा व एकात्मता वृद्धिंगत व्हावी यासाठी लातूर शहर पोलीस उपविभाग व राजर्षी शाहू महाविद्यालयातील रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेत शहरातील विविध महाविद्यालयातील एकुण ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला निबंधाचे परीक्षण डॉ. विजयकुमार करजकर, डॉ. गोविंद उफाडे, प्रा. विजय गवळी यांनी केले. व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. सत्यवान हाके, श्री. योगेश पिस्तुरकर यांच्या हस्ते प्रमाण पत्र वितरीत करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य एम.एच. गव्हाणे, डॉ. ए. जे. राजू, उपविभागीय पोलीस विभागीय अधिकारी श्री. शिलवंत ढवळे, पोलीस निरीक्षक सुनिल नागरगोजे, पोलीस उपनिरीक्षक सौ. स्नेहा पिंपरखेडे इ. उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, प्रा.विजय गवळी व विविध महाविद्यालयातील, प्राध्यापक आणि रासेयोच्या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.

**३४) पंडीत नेहरू जयंती निमित्त बाल दिन साजरा : (दि.१४ नोव्हेंबर २०१७)**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४ नोव्हेबर २०१७ रोजी या दिवशी भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बालदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा. व्ही,ए.गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, चव्हाण विष्णू व रासेयो चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**३५) संविधान दिन जनजागृती अभियान : (दि.२६ नोव्हेंबर, २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विवेक वाहिनीच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ नोव्हेंबर, २०१७ रोजी संविधान दिन जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान चालताबोलता या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून महाविद्यालय परिसर, शहरामधील विविध चौक व ठिकाणी सादरीकरण करुन विद्यार्थी व नागरीकांमध्ये

संविधान दिन जनजागृती अभियानाचे महत्त्व पटवून दिले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी, महाविद्यालयातील कर्मचारी व प्राध्यापकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, बनसोडे कृष्णा, मोहन खराडे, चौहान विष्णू, महेश बिडवे, अजय कांबळे इत्यादीने परिश्रम घेतले.

**३६) महात्मा फुले स्मृती दिन (दि.२८ नोव्हेंबर २०१७)**

दि.२८ नोव्हेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृति दिवस त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.विजय ए. गवळी इतर प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, विष्णू चव्हाण, अजय कांबळे, उपस्थित होते.

**३७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन : (दि.०६ डिसेंबर २०१७)**

दि.०६ डिसेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात भारतरत्न व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.विजय ए. गवळी इतर प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, विष्णू चव्हाण, अजय कांबळे, उपस्थित होते.

**३८) जागतिक मानवी हक्क दिन संपन्नः (दि.१० डिसेंबर, २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील रा.से.यो.च्या वतीने दि.१० डिसेंबर, २०१७ रोजी जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य एम.एच. गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात मानवी हक्काचे उपयोगा संदर्भात मार्गदर्शन केले.

याप्रसंगी रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.विजय गवळी, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.विकास वाघमारे, प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. संगिता तोडकर, विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मोरे प्रतिक्षा, सुतार ईश्वर, साळवे संगपाल, विष्णू चव्हाण, सुरवसे सोनाली, आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.के.डी. सावंत यांनी केले. सूत्रसंचलन कल्पना फरकांडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.पी.जी. कावळे मॅडम यांनी मानले.

**३९) ग्रीन आर्मीत रजीस्ट्रेशन संबंधीत बैठक : (दि.१५ डिसेंबर, २०१७)**

दि.१५ डिसेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात महाराष्ट्र ग्रीन आर्मी रजीस्ट्रेशन करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत रासयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा.विजय गवळी, व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे व इतर विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

**४०) संत गाडगेबाबा पुण्यतिथी स्मृतिदिन म्हणुन साजरा : (दि.२० डिसेंबर, २०१७)**

राजर्षी शाहू महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्यावतीने २० डिसेंबर, २०१७ रोजी संत गाडगेबाबा पुण्यतिथी स्मृति दिवस म्हणुन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून देवगीरी महाविद्यालय, औरंगाबाद येथील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. बाळासाहेब शिंदे यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर प्रकाश टाकत स्वंयसेवकांना श्रम प्रतिष्ठेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी गाडगे बाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तर महाविद्यालयातील रा.से.यो.च्या स्वंयसेवकांनी महाविद्यालयातील वर्ग खोल्यांची स्वच्छता करून गाडगेबाबांची पुण्यतिथी निमित्त स्मृतीदिन साजरा केला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, प्रा.विजय गवळी, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड चे सिनेट सदस्य डॉ. अशोक मोटे, प्रा. विजय दळवी व तर विद्यार्थी प्रतिनिधी विशाल जाधव, मोरे प्रतिक्षा, शेख सोनी, सुरवसे सोनाली, साळवे संगपाल, अजय कांबळे, तसेच इतर विद्यार्थी व प्राध्यापकांनी याकार्यक्रमाला पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

**४१) विभागीय नेतृत्व गुण विकास शिबिर + २ : (दि.२४ व २५ डिसेंबर २०१७)**

राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर विभाग, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय लातूर आणि ग्रामपंचायत कार्यालय, गऊळ ता. कंधार जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तरावर दि.२४ व २५ डिसेंबर २०१७ रोजी दोन दिवशीय नेतृत्व गुण विकास शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांच्या सह प्रत्येक रासेयो चे विद्यार्थी प्रतिनिधी कु. मोरे प्रतिक्षा, कु. सुरवसे सोनाली, विष्णू चव्हाण, बनसोडे कृष्णा या चार विद्यार्थी स्वयंसेवकांनी या शिबिरात सहभाग घेतला व त्या ठिकणी युवा क्रान्ती चा संदेश हे स्वच्छता पर पथनाट्य सांस्कृतीक कार्यक्रमात सादर केले. या कार्यक्रमात शिक्षण उपसंचालक श्री. सुधाकर तेलंग साहेबांनी व इतर वेगवेगळया क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना अनमोल मार्गदर्शन केले.

**४२) राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त निबंध व वक्तृत्व स्पर्धा : (दि. २८ डिसेंबर २०१७)**

दि. २४ डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात तहसील कार्यालय, लातूर यांच्या पत्रानुसार दि. २८ डिसेंबर २०१७ रोजी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. निबंध स्पर्धेचे परीक्षण प्रा. विजय गवळी यांनी तर वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण प्रा. अमोल लांडगे यांनी केले. स्पर्धेत प्रथम/द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या स्पर्धकांना प्राचार्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. व्ही. ए. गवळी यांनी विशेष परिश्रम घेतले.

**४३) पोलीस रेझिंग डे : (दि.०२ जानेवारी, २०१८)**

दि.०२ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हा अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर विभागाच्यावतीने पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगाव, जि. लातूर येथे सकाळी ०८.३० वाजता रेझिंग डे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात २४ तास ऑन ड्यूटी असणाया पालीसांचे कामकाज कसे चालते य ाविषयी माहिती दिली. तसेच पालीस पथसंचलन, पालीसांकडील शस्त्रसाठयांचे प्रदर्शन, महिला किंवा मुलींचे सुरक्षेसाठी दामीणी पथकाची मदत, सोशल मिडीया, दंगल नियंत्रक, बॉम्ब डिस्पोझल, डॉग स्कॉड अश्या विविध प्रत्यक्षीकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालयातील

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, प्रा.विजय ए. गवळी यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजन, एनसीसी, भारत स्काऊट गाईड चे विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमात अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. काकासाहेब डोळे व त्यांच्या सहकार्यांसोबत प्रात्यक्षीके पाह ण्याची संधी विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

**४४) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती : (दि.०३ जानेवारी, २०१८)**

दि.०३ जानेवारी, २०१८ रोजी क्रांतीज्योती भारतातील आद्यशिक्षीका सावित्रीबाई जोतीबा फुले यांची १८७ जयंती राजर्षी शाहू महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्यावतीने साजरी करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.व्ही.ए. गवळी, प्रा.विजय दळवी, डॉ. शैलजा सोमदेव, डॉ. अनुजा जाधव, डॉ. संभाजी पाटील, डॉ. एस. डी. भंडारे, डॉ. पल्लवी पाटील, प्रा. आर. एम. आठवले, डॉ. एम. एस. वावरे, डॉ. एन. एस. पिंपळे, प्रा. सुर्यकांत चव्हाण, प्रा. संगीता तोडकर, प्रा. सुचिता वाघमारे, प्रा. अमोल लांडगे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. वाय. बी. शिखरे, प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे, पोलीस उपनिरीक्षक सौ. एस.एस. पिंपरखेडे, सौ. राधा एस. पवार, सौ. एम. एस.जाधव , विद्यार्थी प्रतिनिधी कल्पना फरकांडे, अजय कांबळे, प्रतिक्षा मोरे व इतर स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**४५) फिल्म अभिनेते मोहन जोशी यांचा मुक्त संवाद : (दि. ०६ जानेवारी २०१८)**

दि.०६ जानेवारी २०१८ रोजी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध सिनेमा अभिनेते श्री. मोहन जोशी यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधले. व विद्यार्थ्यांना आपल्या कलेला विकसित करत या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी कशा निर्माण होत आहेत या बाबतीत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी भाऊ कदम व ओढ चित्रपटातील कलाकारांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. तर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, श्री. महेश बिडवे इत्यादींनी कार्यक्रमाचे विशेष नियोजन केले होते. सदर कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**४६) स्वामी विवेकानंद राजमाता जिजाऊ जयंती निमित्त व्याख्यान :**

**जागतिक युवा दिन : (दि. १२ जानेवारी २०१८)**

दि. १२ जानेवारी २०१८ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र स्टुडंट फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद व राजमाता मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने 'आजच्या युवकांची दिशा व दशा' या विषयावर प्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. गोविंद जाधव यांनी विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा. विलास कांबळे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. व्हि.ए. गवळी तसेच डॉ. डी.जी. पालके, प्रा. सुधीर जाधव, महाराष्ट्र स्टुडंट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश जाधव व रासेयोचे प्रतिनिधी विद्यार्थी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, महाविद्यालयाची जी.एस. कु.सरिता पांचाळ, विक्रांत शंके व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**४७) अतिथी व्याख्यान : (दि. १२ जानेवारी २०१८)**

दि. १२ जानेवारी २०१८ रोजीच जागतिक युवक दिनाच्या कार्यक्रमात महाविद्यालयात जमात-ए-इस्लामी हिंद संघटनेचे संयोजक सेवानिवृत्त पोलिस अधिक्षक श्री.एम.आय. शेख यांनी सांम्प्रदायिक सद्‌भावना या विषयावर अतिथी व्याख्यान देत इस्लाम व हिंदू धर्मातील लोकांनी प्रेमाने शांती व प्रगती स्थापित केली पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी.सावंत, प्रा.व्हि.ए. गवळी तसेच डॉ. डी.जी. पालके, प्रा. सुधीर जाधव, महाराष्ट्र स्टुडंट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश जाधव व रासेयोचे प्रतिनिधी विद्यार्थी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, महाविद्यालयाची जी.एस. कु.सरिता पांचाळ, विक्रांत शंके व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**४८) नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती : (दि. २३ जानेवारी २०१८)**

